IIP: WJHSS
IIP
World Journal of Humanities and Social Sciences

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 01 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# वसाहतवाद राष्ट्रवाद आणि सामाजिक बदल

**[1]स्वप्निल पांडुरंग लोखंडे, [2]प्रा. डॉ. आर. एन. कांबळे**
[1]संशोधक विद्यार्थी, पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठ सोलापूर.
[2](इतिहास विभाग प्रमुख), कला व वाणिज्य महाविद्यालय माढा, तालुका-माढा, जिल्हा-सोलापूर

**Article Info**

***Article History:***
Received: 15th Dec 2025
Accepted: 18th Dec 2025
Published: 20th Dec 2025

***Keywords:***
*वसाहतवाद आणि राष्ट्रवाद, राजकीय नियंत्रण*

**ABSTRACT**

वसाहतवाद आणि राष्ट्रवाद या दोन परस्परविरोधी पण जोडलेल्या संकल्पना आहेत, वसाहतवादाने निर्माण केलेल्या शोषणातून राष्ट्रवादाचा जन्म झाला. एक बाजूला परकीय नियंत्रण आणि दुसऱ्या बाजूला स्वतःच्या राष्ट्रासाठी एकजुटीची भावना, यातून आधुनिक राष्ट्र राज्याची निर्मिती झाली.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: Dec 17, 2025
Similarity Index: 4%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Lokhande, S. P., & Kamble, R. N. (2025). वसाहतवाद, राष्ट्रवाद आणि सामाजिक बदल. *IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS)*, 1(VI), 2008–2013.

**१) प्रस्तावना:**

युरोपातील देशांनी पोर्तुगाल स्पेन ब्रिटन फ्रान्स डच यांनी इतर खंडातील (अमेरिका, आफ्रिका, अशिया) प्रदेशावर राजकीय नियंत्रण मिळवून तेथे वसाहती स्थापन करून स्थानिक लोकांचे आणि संसाधनाचे आर्थिक सामाजिक व सांस्कृतिक शोषण करण्याची प्रक्रिया होय. जी सुमारे इ.स. १५०० पासून सुरू झाली आणि नवीन जगाचा शोध व्यापार आणि साम्राजवाद यातून विकसित झाली यातून साम्राज्ये उभी राहिली ज्यामुळे जगाचा नकाशा बदलला आणि भारतासारख्या देशाच्या इतिहासावर खोलवर परिणाम झाला.

**२. संशोधन पद्धती:-**

प्रस्तुत संशोधनासाठी गुणात्मक संशोधन पद्धती (Qualitative Research Method) आणि आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन (Interdisciplinary Approach) वापरण्यात आलेला आहे.

१. **संकल्पनात्मक विश्लेषण:** वसाहतवाद आणि राष्ट्रवादी या दोन परस्पर विरोधी वाटणाऱ्या संकल्पनांचा तात्विक अभ्यास.
२. दुय्यम स्त्रोत विविध पुस्तकातील आशय, संशोधन पत्रिका याचा संदर्भ म्हणून वापर
३. तुलनात्मक अभ्यास लिखित इतिहास वसाहतवाद व राष्ट्रवाद यातील तफावत व साम्य यांचा अभ्यास.

**३. वसाहतवाद:**

वसाहतवाद म्हणजे एका देशाचा दुसऱ्या देशावर आर्थिक राजकीय आणि सामाजिक नियंत्रण प्रस्थापित करणे, यामध्ये वसाहतकार देश आपल्या वसाहतीवर पूर्णपणे किंवा अंशता सत्ता ठेवतो आणि त्या देशाच्या संसाधनाचा वापर करून स्वतःच्या हितासाठी फायदा करतो. वसाहतवादाचा मुख्य उद्देश म्हणजे वसाहतकार देशाचा विस्तार करणे आणि त्यांच्या आर्थिक व राजकीय सामर्थ्याला बळकट करणे होय.

वसाहतवादाचे स्वरूप वेगवेगळ्या प्रकारचे दिसून येते. काही वेळा तो थेट सैन्याद्वारे किंवा राजकीय दबावाद्वारे असतो, तर काही वेळा आर्थिक दबावा द्वारे किंवा सांस्कृतिक प्रभावा द्वारे वसाहतवाद प्रस्थापित केला जातो. वसाहतकार देश आपल्या वासाहतीमध्ये स्थानिक लोकांच्या संसाधनाचे शोषण करतो. त्याचे स्वतंत्र्य आणि संस्कृती नष्ट करतो. आणि त्यांना आपल्या नियंत्रणाखाली ठेवतो.

वसाहतवादामुळे वसाहत देशांमध्ये सामाजिक असमानता वाढते, स्थानिक सांस्कृतिक चा नाश होतो आणि आर्थिक विकासावर नकारात्मक परिणाम होतो त्यामुळे वसाहतवादाला अनेक देशांनी विरोध केला आणि स्वतंत्र संग्राम सुरू केला, अशा प्रकारे वसाहतवाद हा एक प्रकारचा परकीय नियंत्रण असून तो आर्थिक राजकीय आणि सामाजिक स्वरूपाचा असतो, ज्यामुळे वसाहतकार देशाचा विस्तार होतो आणि आक्रमण झालेल्या देशाला त्रास सहन करावा लागतो. थोडक्यात काय तर एका देशाने दुसऱ्या देशावर संपूर्ण ताबा मिळवून त्याचे शोषण करणे आणि स्वतःच्या संस्कृतीचा प्रचार करणे होय.

**३.१ वसाहतवादा प्रमुख वैशिष्ट्ये:**

**१) राजकीय वर्चस्व:**

वसाहतवादी देश जिंकलेल्या प्रदेशावर राजकीय नियंत्रण ठेवतात आणि तेथील लोकांवर राज्य करतात.

**२) आर्थिक शोषण:**

वसाहतवादी देश स्थानिक संसाधने आणि श्रमाचे शोषण करतात तसेच स्थानिक उद्योगांना नष्ट करतात.

**३) सांस्कृतिक प्रभाव:**

वसाहतवादी देश आपली भाषा धर्म आणि इतर सांस्कृतिक पद्धती लादतात आणि स्थानिक संस्कृती दडपून टाकतात.

**४) सामाजिक असमानताः**

वसाहतवादाच्या प्रक्रियेत सामाजिक असमानता निर्माण होते आणि स्थानिक लोकांच्या हक्कापासून त्यांना वंचित ठेवले जाते.

**३.२) वसाहतवादाचे प्रमुख कारणे:**

वसातवादाची प्रमुख कारणे ही, आर्थिक, राजकीय आणि सामाजिक आहेत औद्योगीकरणामुळे कच्च्या मालाची गरज, बाजारपेठांची गरज, नैसर्गिक संसाधनाचे शोषण, व्यापार वाढवणे, साम्राज्य विस्ताराची महत्त्वकांक्षा आणि युरोपिय देशांची श्रेष्ठत्वाची भावना यांचा समावेश होता, ज्यामुळे युरोपिय राष्ट्रांनी आशिया, आफ्रिका आणि अमेरिकेत वसाहती स्थापन करून स्थानिक लोकांचे शोषण केले. थोडक्यात वसाहतवाद हा आर्थिक फायद्यासाठी सुरू झाला पण त्यात राजकीय आणि सांस्कृतिक वर्चस्वाच्या इच्छाही मिसळलेल्या होत्या, ज्यामुळे जगाच्या मोठ्या भागावर युरोपीय देशांनी राज्य केले

वसाहतवादाचे भारतावरील परिणाम बहुआयामी होते, ज्यात आर्थिक शोषण, राजकीय अधीनता, सामाजिक व्यत्यय सारखे नकारात्मक परिणाम झाले. पण त्याचबरोबर शिक्षण कायदेशीर व्यवस्था राजकीय व्यवस्था आणि राष्ट्रवादाची भावना सारखे काही सकारात्मक परिणाम दिसून आले.

**३. ३) सकारात्मक परिणाम**

**१) राष्ट्रवाद व लोकशाही:**

वसाहतवादाने लोकांना राष्ट्रवाद आणि लोकशाही यासारख्या आधुनिक राजकीय संकल्पना शिकवल्या ज्यामुळे स्वतंत्र चळवळीला चालना मिळाली,

**२) शिक्षण आणि कायदेशीर व्यवस्था:**

एकसंघ आधुनिक प्रशासकीय व्यवस्था आणि कायद्याची चौकट (I.P.C) लागू झाली, ब्रिटिश राजवटीने आधुनिक शिक्षण प्रणाली कायदेशीर व्यवस्था आणि संसदीय प्रणालीची सुरुवात केली याचा परिणाम आजही दिसून येतो.

**३) पायाभूत सुविधा:**

रेल्वे जाळे, बंदरे आणि टेलीग्राफ प्रणाली विकसित झाल्या आणि दळणवळ या सारख्या साधनांच्या पायाभूत सुविधांच्या विकासाला चालना मिळाली, जी स्वातंत्र्यानंतर ही उपयुक्त ठरली.

**४) सामाजिक सुधारणा**

काही सामाजिक सुधारणेला चालना मिळाली, पण त्यातूनही वसाहतवादाचे फायदे जास्त झाले.

**५) शिलालेख उलगडे:**

भारतीय पुरातत्व विभागाची (ASI) स्थापना झाली आणि प्राचीन इतिहासाचा शोध लागला.

**३. ४) नकारात्मक परिणाम:**

**१) आर्थिक शोषण:**

ब्रिटिश राजवटीमुळे भारतीय उद्योगाचा ऱ्हास झाला, संसाधने लुटली गेली, गरीबी वाढली आणि देशातील कच्च्या मालाची निर्यात केली व पक्का माल तयार करून परत देशातील लोकांना ग्राहक बनवले.

**२) राजकीय अधीनता:**

भारताचे राजकीय व्यवस्था ब्रिटिशांच्या नियंत्रणाखाली आली ज्यामुळे देशाच्या भूमिकेत बदल झाला.

**३) सांस्कृतिक हास:**

वसाहत वादामुळे भारतीय संस्कृतीवर नकारात्मक परिणाम झाला. ज्यामुळे काही परंपरा आणि ज्ञान प्रणाली दुर्लक्षित झाल्या..

**४) वंशवाद आणि भेदभाव:**

वसाहत वादामुळे आजही वंशवाद आणि भेदभावासारखे नकारात्मक परिणाम दिसून येतात. असे संयुक्त राष्ट्राच्या अहवालात नमूद केले आहे.

**४) राष्ट्रवाद:**

राष्ट्रवाद या संकल्पनेचा सरळ साधा अर्थ राष्ट्र प्रेमाची भावना असा होतो राष्ट्रवाद म्हणजे काय हे समजून घेण्यासाठी आपल्याला आधी राष्ट्र म्हणजे काय हे समजून घ्यावे लागेल राष्ट्रासाठी इंग्रजी भाषेमध्ये Nation हाय पर्यायी शब्द वापरला जातो Nation हा इंग्रजी शब्दाची उत्पत्ती लॅटिन भाषेतील Natio या शब्दापासून झाली आहे याचा अर्थ जन्म किंवा वंश असा होतो व्यक्तीला जन्मता मिळालेला धर्म वंश भाषा संस्कृती परंपरा यामुळे एखाद्या लोकसमूहामध्ये निर्माण झालेली एकत्वाची भावना हा राष्ट्र प्रेमाचा म्हणजेच राष्ट्रवादाचा आरंभबिंदू असतो. राष्ट्रवाद नागरिकांमध्ये बंधूभाव, निष्ठा व त्यागाची भावना राष्ट्रहिताला अग्रक्रम अशा बाबींची रुजवणूक करत असतो एका उन्नत सामाजिक जीवनाकडे आर्थिक प्रगतीकडे नेण्याचे सामर्थ्य राष्ट्रवादामध्ये आहे, साम्राज्यवादाला वसाहत वादाला आव्हान देण्याचे महत्त्वाचे कार्य राष्ट्रवादांनी केलेले असते. तरीही राष्ट्रवाद जगाला युद्धाकडे नेऊ शकतो याचा प्रत्यय ही माणसाला दुसऱ्या महायुद्धाच्या रूपाने आला आहे. राष्ट्र म्हणजे नेमकं काय आणि राष्ट्रवाद म्हणजे नेमकं काय हे आपल्याला पुढील काही व्याख्यांच्या माध्यमातून सूत्रबद्ध रूपात समजून घेता येईल.

**४. १ राष्ट्रीय संकल्पनेच्या काही व्याख्या.**

**१) बर्जेस :-**

वंशिक एक्य असलेला व एकाच भौगोलिक प्रदेशात राहणारा जनसमुदाय म्हणजे राष्ट्र होय.

**२) गार्नर:-**

ज्या जनतेची संस्कृती समान आहे जी जनता वैचारिक आणि मानसिक जीवनाची व आचार विचारांची एकता हेतूपुरस्पर आणि कसोशीने कायम ठेवतात, त्या लोकांचे राष्ट्र तयार होते. अशा प्रकारे एका विशिष्ट भूप्रदेशात राहणाऱ्या आणि समान भाषा समान वंश व समान धर्म समान संस्कृती, चालीरीती व परंपरा यामध्ये एकत्वाची भावना असणाऱ्या लोकसमूहाचे राष्ट्र बनते आणि अशा राष्ट्राविषयी असलेली प्रेमाची त्यागाची बलिदानाची भावना राष्ट्रवाद म्हणून ओळखली जाते. मुख्यत्वे राष्ट्रवादी एक मानसिक भावना आहे राष्ट्रवादी या संकल्पनेच्या काही व्याख्या खालील प्रमाणे पाहता येतील.

**१) अल्फ्रेड डी ग्रासिया:-**

राष्ट्रवाद स्वदेशासाठी प्रेमाने परख्यांविषयी जागरूकता निर्माण करतो.

**२) एम एच हिन्से:**

आपल्या राष्ट्रपतीच्या निष्ठेची जाणीव असणारी मनाची अवस्था म्हणजे राष्ट्रवाद होय.

**३) प्रा. हेरॉल्ड लास्की :-**

समान वंश भाषा इतिहास परंपरा वास्तव व राजकीय आकांक्षा या सर्वांमुळे अगर त्यापैकी काहींच्या प्रभावामुळे निर्माण होणारी एकतेची भावना म्हणजे राष्ट्रवाद होय.

**४) लॉर्ड बॉईस :-**

भाषा संस्कृती साहित्य रूढी व परंपरा यांच्या समानतेमुळे भावनात्मक आणि मानसिक दृष्ट्या समाजात निर्माण झालेली एकतेची भावना म्हणजेच राष्ट्रवाद होय.

**५) प्रा गिलख्रिस्ट:-**

एकाच वंशाची एकाच प्रदेशात वास्तव करणारे एकच भाषा बोलणारे, समान धर्म व समान परंपरा असणारे लोक जेव्हा समान राजकीय संघटनांमध्ये राहतात तेव्हा त्यांच्या मनात एक विशिष्ट राजकीय एकतेची भावना निर्माण होते त्यालाच राष्ट्रवाद असे म्हणतात.

थोडक्यात राष्ट्रवाद म्हणजे एका राष्ट्राबद्दल वाटणारी तीव्र निष्ठा, प्रेम आणि अभिमान, व्यक्ती आपल्या राष्ट्राला इतर राष्ट्रापेक्षा श्रेष्ठ मानते आणि राष्ट्राच्या हिताला प्राधान्य देतो ही भावना समान संस्कृती भाषा धर्म किंवा राजकीय विचारसरणीवर आधारित असते. जिथे लोक त्यांच्या राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी आणि एकतेसाठी एकत्र येतात आणि स्वतःच्या देशाच्या सार्वभौमत्वाला महत्त्व देतात अशी एक राजकीय विचारसरणी याला राष्ट्रवाद असे म्हणतात.

**४.2) राष्ट्रवादाचा इतिहास:-**

राष्ट्रवादाचा उदय प्रथम युरोपमध्ये झाला राष्ट्रवाद ही संकल्पना प्रथम जोहान गॉटफ्रीड हडर यांनी वापरली. मार्क्सवाद राष्ट्रवादीच्या कोणत्याही सिद्धांत प्रदान करण्यात अयशस्वी झाला. जगातील कामगारांना एक व्हा असे म्हणणारे मार्क्स आणि एंजल्स असे म्हणतात की भांडवलशाहीच्या विकासात राष्ट्रवादाचे योगदान जास्त आहे, राष्ट्रवाद ही व्यापक संकल्पना असून काळातील बदलाप्रमाणे राष्ट्रवाद या संकल्पनेत बदल होत जातात भौगोलिक एकता असलेल्या प्रदेशात वस्ती करणारा वांशिक एकता असणारा लोकसमुदाय हा एक राष्ट्राचा भाग असतो, राष्ट्रवादी एक मानसिक भावना आहे ज्या माध्यमातून एका विशिष्ट भागात राहणाऱ्या लोकांमध्ये एकात्मतेची भावना निर्माण होते.

**४. ३) राष्ट्रवादाची प्रमुख वैशिष्ट्ये:**

**१) राष्ट्राशी एकरूपता:-**

व्यक्ती आपल्या राष्ट्राशी भावनिक आणि वैचारिक दृष्ट्या जोडलेली असतात.

**२) सर्वोच्च निष्ठा:-**

राष्ट्राप्रती असलेली निष्ठा इतर कोणत्याही व्यक्ती किंवा समूहाच्या हितापेक्षा श्रेष्ठ मानली जाते.

**३) सामायिक ओळख:-**

समान भाषा वंश धर्म इतिहास किंवा सांस्कृतिक मूल्यांवर आधारित ही भावना असते.

**४) राजकीय उद्दिष्ट:**

राष्ट्राचे स्वातंत्र्य एकता आणि स्वशासनाचे अधिकार सुरक्षित ठेवणे हे राष्ट्रवादीचे उद्दिष्ट असते.

**५) राष्ट्रभक्ती:-**

आपल्या देशाच्या संस्कृती परंपरा आणि मूल्यांबद्दल आदर व अभिमान बाळगणे होय.

**५) वसाहतवाद व राष्ट्रवादाचा सामाजिक बदल:-**

वसाहतवाद व राष्ट्रवादाचा सामाजिक बदल मोठ्या प्रमाणावर झाला, वसाहतवादाच्या प्रभावामुळे भारतीय समाजाने अनेक आव्हानाचा सामना केला परंतु त्याचवेळी या प्रक्रिया आणि संघर्षामध्ये भारतीय समाजाच्या नव्या ओळखीची संघर्षाची आणि परिवर्तनाची दिशा देखील निर्माण झाली, वसाहतवादाचा प्रारंभ ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या व्यापारामुळे १६ व्या शतकाच्या अखेरीस झाला आणि नंतर १८५८ मध्ये ब्रिटिश साम्राज्याच्या स्थापनेसह भारतावर ब्रिटिशांचे वर्चस्व पूर्णपणे प्रस्थापित झाले, ब्रिटिश राजवटीने भारतातील राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक पद्धतीमध्ये अनेक महत्त्वाचे बदल घडवले भारतातील समाजाच्या विविध अंगावर झालेल्या बदलाचा अभ्यास करणे हा या शोधनिबंधाचा मुख्य उद्देश आहे.

**५.१) सामाजिक बदलाचे स्वरूप:-**

**१) पाश्चात्य शिक्षणाचा प्रभाव:-**

वसाहत वादाने आपल्या पाश्चात्य शिक्षणामुळे नवीन विचार लोकशाही मूल्य आणि वैज्ञानिक दृष्टिकोन समाजात निर्माण झाला.

**२) आधुनिकता आणि परंपरा यांचा संघर्ष:-**

पाश्चात्य विचारामुळे पारंपारिक चालीरीती अंधश्रद्धा आणि सामाजिक रूढींना आव्हाने मिळाली काही रुढी बदलल्या तर काही रुढीच्या विरोधात संघर्ष सुरू झाला.

**३) सामाजिक सुधारणा:-**

शिक्षण आणि नवीन विचारांमुळे समाज सुधारणा झाली. (उदा. राजा राम मोहन रॉय, महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर), यांच्या माध्यमातून सामाजिक सुधारणा घडवून आणण्यास प्रेरणा मिळाली जसे की सतीबंदी, विधवा पुनर्विवाह, जातीय भेदभाव विरुद्ध लढा या सारखा सामाजिक विचार समाजात रुजला.

**४) नवीन सामाजिक गट: -**

वसातवादाच्या काळात नवीन व्यावसायिक गट (व्यापारी नोकरदार) आणि बुद्धिजीवी वर्ग उदयास आला ज्यांनी सामाजिक आणि राजकीय बदलांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली.

**५) सांस्कृतिक आदानप्रदान:**

वसाहत वादाच्या प्रभावामुळे स्थानिक आणि पाश्चात्त्य संस्कृती यांच्यात आदान-प्रदान झाले ज्यामुळे समाजात अनेक नवीन गोष्टीची भर पडली.

**६) निष्कर्ष:-**

वसाहत वाद आणि राष्ट्रवाद एकमेकांशी जोडलेले आहेत. वसाहतवादाने आणलेल्या बदलाची (चांगल्या वाईट) आणि शोषणाने भारतीय समाजात मोठे परिवर्तन घडवले. याच बदलाच्या आणि प्रतिक्रियेतून राष्ट्रवादाची भावना बळवली. ज्यामुळे अखेरीस वसाहतवादातून मुक्ती मिळाली पण त्याचे सामाजिक आर्थिक आणि सांस्कृतिक परिणाम अजूनही आधुनिक भारताच्या जडणघडणीत महत्त्वाचे ठरतात.

**संदर्भ ग्रंथ**

१) वसाहतवाद आणि राष्ट्रवाद एक मार्क्सवादी दृष्टिकोन, पृष्ठ क्र ७४
२) वसाहतवाद एक परिचय (बर्नार्ड कोहेन), पृष्ठ क्र ११३
३) भारतातील राष्ट्रवादी एक अभ्यास, पृष्ठ क्र २२
४) (Nationalism in india: A study) (सुनील खिलानानी)
५) भारतातील वसाहतवाद आणि राष्ट्रवाद. (डॉ. बी आर आंबेडकर) पृष्ठ क्र ६६
६) मराठी विश्वकोश (vishwakosh.gov.in)
७) एमेजिंड कम्युनिटीज (बेनेडिक्स एडरसन) (१९८३),पृष्ठ क्र ४६
८) राष्ट्रवाद (Nationalism) (रवींद्रनाथ टागोर.), पृष्ठ क्र ७३
९) नेशन्स अँड नॅशनलिजम (एथनी डी. स्मित),पृष्ठ क्र ४३
१०) भारतीय राष्ट्रवाद. (एस. इरफान हबीब ) वाणी प्रकाशन, पृष्ठ क्र ६९
११) Research gate, Google scholar.